**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक २४ जुलै**

**फौजदार चावडी पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४८३/२०१७ भादंविसक १४३,१४७,१४८,१४९,३२३,३२७,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २२/०७/२०१७ रोजी १९.३० वा चे दरम्यान,जुना पुना नाका येथील हॉटेल समर्थ समोरील रोडवर,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २३/०७/२०१७ रोजी १७.५९ वाजता. |
| **फिर्यादी** | : | देवप्पा सुकदेव कांबळे,वय ३५,रा. न्यु.बुधवार पेठ,आंबेडकर नगर,सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | शिवाजी भोसले, व इतर १० लोक. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा मालकांचा मुलगा मनिष कोफलीचा याने मोबाईलवरून फोन करून सांगीतले की, आपले बाळे येथील हॉटेल रायगड शेजारी असलेल्या खुल्या प्लॉटचे तार तोडलेले आहे.काय झाले ते बघा मी पण येतो त्यानंतर फिर्यादी व फिर्यादीचे मित्र बिबिशन लोंढे व अमोल गोडसे असे सदर प्लॉट जवळ गेले व हॉटेल रायगडच्या कामगारास सांगीतले कि तुझ्या मालकास बोलावुन घे आम्ही थोडयावेळ वाट पाहुन सदर हॉटेलच्या कामगाराकडुन हॉटेल मालकाचा फोन नं. घेवुन हॉटेल मालकास फोन लावला असता,त्यांनी फोनवर शिवीगाळ केली थोडयावेळाने बाळे पोलीस चौकीचा पोलीस स्टफ तेथे आला व त्यांनी आम्हांस जाण्यास सांगीतल्याने फिर्यादी हे मित्रांना घेवुन शिवाजी चौकात आले नंतर सायंकाळी १७.०० वा नमुद आरोपी यांचा फोन आल्याने तो फिर्यादीने उचलला व तेंव्हा नमुद आरोपी याने तुला बोलायचे आहे.त्यानंतर फिर्यादी हा शिवाजी चौकातुन हॉटेल समर्थ समोर थांबला असता,सदर ठिकाणी नमुद आरोपी क्रं.१,हा १० लोकांसह तेथे आला व आरोपी क्रं.१ याने तु कोण रे असे म्हणुन गच्चीला पकडुन शिवीगाळ करून मारहाण करू लागले त्यावेळी फिर्यादीचा मित्र बिबिशन लोंढे हा सोडविण्यास आला असता,त्यास ही मारहाण करू लागले व आरोपी क्रं. १ यांचे सोबत आलेल्या १० लोकांनी बेल्टने,काठीने,सळईने मारहाण केली.सदर मारहाणीमध्ये फिर्यादीच्या सर्वागांस मुक्का मार लागुन,पाठिवर वळ उमटले असुन तोंडावर गालावर व डोळयावर सुज आली आहे. सदर मारहाणीत आरोपी क्रं. १ याने फिर्यादीच्या गळयातील दोन तोळे सोन्याची चैन ओढुन घेवुन शर्टाच्या खिशातील ८००/- रु. काढुन घेतले म्हणुन तपास:- सपोनि/जमादार |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४४४/२०१७ मु.ओ.प्लॅ.अँ क. ३,५,७,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २३/११/२०१६ ते २३/०७/२०१७ पर्यंत, ९७,पाम्स अपार्टमेंट प्लॉट नं.२०२,चंदन नगर जुळे,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २३/०७/२०१७ रोजी २२.१२ वाजता. |
| **फिर्यादी** | : | अमोल दत्तात्रय गोवित्रीकर,वय ३८,रा. सदर |
| **आरोपीचे नांव** | : | श्रीमती सुशीला जाजु व त्यांचा मुलगा निलेश जाजु.दोघे रा. चंडक बगीचा बुधवार पेठ,सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील अरोपीतांनी फिर्यादीस दिलेल्या अश्वासनाप्रमाणे कोणतेही काम नमुद अपार्टमेंट मध्ये वेळेवर केले नसुन फ्लॅटची रक्कम स्वीकारुन देखील फ्लटची कामे अर्धवट व निकृष्ट दर्जाची केली म्हणुन.तपासः- दुपोनि/फुगे. |

**सोलापूर पोलीस आयुक्तालय शहर करिता.**